## "BEST DETECTION OF THE MONTH SEPTEMBER 2019"

दिनांक **०४/१२/२०१९** रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते भरूचा सभाग्रह, सहावा मजला, नविन पोलीस आयुक्त इमारत, पोलीस आयुक्त कार्यालय मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या **माहे सप्टेंबर—२०१९** या महिन्याचा **"BEST DETECTION OF THE MONTH "** चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

| ०१ | **कुरार पोलीस ठाणे** | **गु.र.क्रं. ३९४/१९, कलम ३०२ भादवि,** |
|---|---|---|

**''खून''**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत:—** कुरार पोलीस ठाणेस दिनांक २८/०९/१९रोजी अपमृत्यू नोंद क्र. १८४/१९ दाखल करण्यात आला होता. सदर अपमृत्यु मधील मयत मुलगी कु. जीया इजाज अन्सारी वय ०२ वर्ष ही तीचे नातेवाईकांसोबत राहत असलेल्या बिल्डींगच्या ६व्या माळयावरून खाली पडून मयत झाल्याचे तिचे नातेवाईकांडून सांगण्यात आले होते.

घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली असता घटनास्थळ, परिस्थिती जन्य पुरावे, वैद्यकीय अधिकारी यांचा शवविच्छेदनानंतरचा अभिप्राय यावरून सदर अपमृत्युबाबत संशय निर्माण झाल्याने घरातील सर्व नातेवाईकांकडे करण्यात आलेल्या सखोल चौकशीत मयत मुलीच्या आजीने इमारतीचे ६व्या माळयावरील राहते घराचे खिडकीतून खाली फेकून जीया हिचा खून केला असल्याचे खात्रीलायकपणे निष्पन्न झाल्याने फिर्यादी श्रीमती सानिया इजाज अन्सारी वय २१ वर्ष, धंदा—गृहिणी,यांची फिर्याद नोंद करून कुरार पोलीस ठाणे गुरक्र. ३९४/१९ कलम ३०२ भादवि नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्रीमती सानिया इजाज अन्सारी वय २१ वर्ष, |
| **बळीत/मयत** | :— | कु. जीया इजाज अन्सारी वय ०२ वर्ष |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | रूक्साना उबेदुल्ला अन्सारी वय ५० वर्ष.<br>३०/०९/१९ |

१. **तपास कौशल्य** :— मुख्य नियंत्रण कक्षाकडून दिनांक २८/०९/१९ रोजी सकाळी ०६:४९ वा. कुरार—१ मोबाईल वाहनास एस.आर.ए बिल्डींग नं.—४, येथे एक अंदाजे ०२ वर्ष वयाची मुलगी ६व्या माळयावरून खाली पडून जखमी झाली असलेबाबत संदेश प्राप्त झाला.

२. प्राप्त संदेशावरून कुरार पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी घटनास्थळी गेले असता स्थानिक लोकांकडून समजले की, परिसरात राहणारी मुलगी नामे श्रद्धा कांबळे हिने सकाळी ०६:४०

वा. चे सुमारास नमुद इमारतीमध्ये राहत असलेली जिया हिस बिल्डींग नं.४ चे खाली जमीनीवर जखमी अवस्थेत पाहीलेवरून तीने जिया हिचे राहते घरी बिल्डींग नं.४, ६वा माळा, रूम नं.६०५ येथे जावून जिया हिचे घरातील लोकांना उठवले व ''जिया किधर है। जिया तो निचे जमीनपर पडी है।'' अशी माहिती दिली. त्यावरून तीचे आई—वडीलांनी इमारतीचे खाली येवून जिया हिस उपचाराकरीता शताब्दी रूग्णालय, कांदीवली (प) मुंबई येथे नेले असल्याची माहिती मिळाली.

३. कुरार पोलीस ठाणेचे पोलीस पथक घटनास्थळी अधिक चौकशी करीत असताना शताब्दी रूग्णालयाकडून सदर जखमी मुलगी नामे जिया वय ०२ वर्ष हि दाखलपूर्व मयत झालेली असलेबाबत संदेश प्राप्त झालेवरून कुरार पोलीस ठाणेस दिनांक २८/०९/१९ रोजी अपमृत्यु नोंद क्र. १८४/१९ दाखल करण्यात आला.

४. प्राथमिक चौकशीत सदर अपमृत्युमधील मयत मुलगी कु. जीया इजाज अन्सारी, वय ०२ वर्ष ही तीचे आई—वडील व इतर नातेवाईकांसोबत राहत असलेल्या एस.आर.ए बिल्डींग नं.—४, ६वा माळा, रूम नं.—६०५ येथून खाली पडून तीचा मृत्यु झाल्याचे तिचे नातेवाईकाकडून सांगण्यात आले.

५. नमुद अपमृत्यु प्रकरणाचे अनुषंगाने घटनास्थळ एस.आर.ए बिल्डींग नं.—४, ६वा माळा, रूम नं. ६०५, आप्पापाडा, मालाड (पूर्व), मुंबई येथे पोलीस पथकासह जावुन बारकाईने पाहणी केली. मयत मुलगी ज्या ठिकाणी खाली पडली होती ते घटनास्थळ, तीचे राहते घर, घटनेचा प्रकार, घटनेची वेळ, मयत मुलीचे वय, तसेच घटनास्थळावरील एकूण परिस्थिती यावरून सदरची घटना अपमृत्यु प्रकरणाशी मेळ खात नसल्याचे दिसून आले व सदर अपघाती मृत्यु हा घडवुन आणल्याचा वाजवी संशय निर्माण झाला.

६. त्यावरून मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रा. विभाग मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली मा. पोउआ, परिमंडळ— १२, मा. सपोआ समतानगर विभाग, व कुरार पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि पोलीस पथक यांनी सदर अपमृत्यु प्रकरणाचे अनुषंगाने पुढील तपास सुरू केला.

७. तपासात मयत मुलगी नामे जिया अन्सारी वय ०२ वर्ष हिचे सोबत नमुद घरात राहत असणाऱ्या सर्व नातेवाईकांची माहिती घेतली असता तीचे सोबत तीची आई १) श्रीमती सानीया अन्सारी, २) वडील श्री. इजाज अन्सारी, ३) आजोबा उबेदुल्ला अन्सारी ४) आजी रूक्साना उबेदुल्ला अन्सारी व ५) आत्या नामे रूमाना नदीम अन्सारी आणि तीचा मुलगा हमजा अन्सारी २ वर्ष असा परीवार एकत्र राहणेस असल्याची माहिती मिळाली. त्यांचेकडे तसेच शेजारी राहणाऱ्या इतर लोकांकडे अधिक सखोल चौकशी केली असता मयत मुलीची आई व सासु—सासरे यांचे दरम्यान कौटुंबिक वाद असून वरचेवर भांडणे होत असल्याची माहिती मिळाली. पोलीस पथकाने मयत मुलीचे राहते घर बिल्डींग नं.४, ६वा माळा, रूम नं.—६०५ याची पाहणी केली असता घटनास्थळी ज्या दिशेला जिया ही खाली जमीनीवर पडली होती. त्या दिशेस रूम नं.—६०५ ची घरातील स्वयंपाक खोलीतील स्लायडींगची खिडकी होती. खिडकीची स्लायडींग साधारण ३ फूट उंचीवर होती. तसेच खिडकीचे आतील बाजुने स्टूल व पाण्याची भांडी ठेवलेली व त्यांची कुठल्याही प्रकारे पडझड न झाल्याचे दिसून आले. त्यामुळे सदरचा अपघाती मृत्यु हा घडवून आणल्याचा संशय अधिक

गडद झाला.

८. त्यावरून मयत मुलीचे घरातील सर्व सदस्यांना पोलीस ठाणेस आणून मा. पोलीस उप–आयुक्त, परिमंडळ–१२, मुंबई तसेच मा. सपोआ समतानगर विभाग, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली चौकशी सुरू केली असता जिया हिची ताप व उल्टीमुळे तब्बेत ठिक नसल्याने दिनांक २७/०९/१९ रोजीचे रात्री ०४:०० वा. पर्यत घरातील सर्वजण जागे होते. त्यानंतर झोपताना घराचा दरवाजा तसेच खिडकी यास आतून व्यवस्थीत कडी लावून सर्वजण झोपी गेल्याचे तसेच जिया ही तीचे आई–वडीलांचे मध्ये झोपली असल्याची माहिती मिळाली. त्यावरून सदरची घटना ही पहाटेच्या वेळेसच घडल्याची खात्री झाली. घराची स्लायडींग खिडकी बंद होती, मुख्य दरवाजा देखील आतून बंद होता. खिडकीची स्लायडींग साधारण ३ फूट उंचीवर होते. यावरून जिया ही खिडकी उघडून स्वत: खाली पडणे शक्यच नव्हते. म्हणजेच घरातील पाच व्यक्तींपैकी एकाने जिया हिचे सोबत सदरचा प्रकार केला असल्याची खात्री झाली. परंतु नातेवाईक घरातीलच सदस्य असल्याने तसेच घरात दु:खाचे वातावरण असल्याने भावनिक प्रश्न निर्माण होवून तपासात अनेक अडचणी येत होत्या. मयत मुलीची आई सानिया इजाज अन्सारी वय २१ वर्ष हि सात महिन्यांची गरोदर होती. तसेच मयत मुलीचे आजी –आजोबा हे वयस्कर असल्याने त्यांचेकडून प्रकृती अस्वास्थामुळे चौकशी दरम्यान अपेक्षित सहकार्य मिळून येत नव्हते. त्यामुळे घडलेल्या गुन्हयाचे अनुषंगाने काहीएक धागादोरा मिळून येत नव्हता. परंतु सदरची घटना हा अपघाती मृत्यु नसून खुन असल्याने गुन्हयाची उकल होणे अतिशय गरजेचे होते तसेच ते आव्हानात्मक ठरत होते.

९. दरम्यान शताब्दी रूग्णालय, कांदीवली (प) मुंबई यांचेकडून जिया हिचे मृत्यूचे कारण **"Death d/t head injury and blunt trauma to chest and abdomen"** असा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला.

१०. मयत मुलीचे प्रत्येक नातेवाईकांकडे वारंवार चौकशी केली परंतु गुन्हयाची उकल होण्याकरीता अपेक्षीत धागा मिळून येत नव्हता. जिया हिचे मृत्यूबाबत आम्हाला सकाळी श्रद्धा कांबळे हिचेकडूनच समजले होते असे उत्तर प्रत्येक नातेवाईक देत होता. जियाची आत्या रूमाना हिचा मुलगा हमजा वय ०२ वर्ष याचे खेळताना नेहमी जिया सोबत भांडण व मारामारी होत होती. आजी–आजोबा जियाचा तिरस्कार करून नातु नामे हमजा अन्सारी वय २ वर्ष यास जास्त प्रेम करीत होते. तसेच जिया हिचे आई–वडील त्यांना मुलगा हवा म्हणून जियाचा तिरस्कार करण्याची शक्यता होती. अशाप्रकारे घरातील प्रत्येक सदस्यावर काही ना काही कारणास्तव संशयाची सुई वारंवार फिरत असल्याने सहनशीलता न गमावता चौकशीत सातत्य ठेवून चौकशी करणे आवश्यक असल्याने प्रत्येकास पुनश्च: स्वतंत्र चौकशीवर घेवून अधिकारी, अंमलदार, तसेच महिला अंमलदार यांचे मार्फतीने एकाच वेळी अनेक प्रश्नांची त्यांचेवर सरबत्ती करण्यात आली. त्यांनी काही वेळापूर्वी चौकशी दरम्यान दिलेली उत्तरे व सध्याची उत्तरे यामधील सातत्य, तफावत यांच्या नोंदी घेण्यात आल्या. त्यांचे चेहऱ्यावरील भाव टिपण्यात आले.

११. अशा प्रकारे जिया हिचे आई–वडील, आत्या व आजी–आजोबा यांचेकडे दिनांक २८/०९/१९ चे दुपारचे १३:०० वा. पासून दिनांक २९/०९/१९ रोजी रात्रीचे

०२:०० वा. पर्यत सातत्याने वारंवार चौकशी चालू असताना मयत मुलीची आजी नामे रूक्साना उबेदुल्ला अन्सारी, वय ५० वर्ष हिचेकडे चौथ्यांदा पुनश्च: चौकशी करीत असताना तीने या अगोदर चौकशी दरम्यान दिलेली उत्तरे, इतर नातेवाईक यांचेकडून मिळालेली माहिती व तीची सध्याची उत्तरे यामध्ये बरीच तफावत आढळली. तोच धागा पकडून पोलीस पथकाने सदर महिलेची वेगवेगळया प्रकारे उलट—सुलट प्रश्न विचारून अधिक सखोल चौकशी केली. चौकशी दरम्यान प्रश्नांनुरूप तीची बदलत जाणारी उत्तरे, तीचे चेहऱ्यावरील हावभाव व उत्तरे देताना तीचा कमी—कमी होत जाणारा आत्मविश्वास याचे बारकाईने निरीक्षण करण्यात आले. या अगोदर करण्यात आलेल्या चौकशीत मयत मुलीची आई व सासु—सासरे यांचे दरम्यान चालू असलेले कौटुंबिक वाद तसेच आजी रूक्साना ही जियाचा तिरस्कार करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यामुळे रूक्साना उबेदुल्ला अन्सारी, वय ५० वर्ष हिचेवरील संशय अधिक गडद झाला. परंतु त्याच वेळेस तीने चक्कर आल्याचे व श्वसनाचा त्रास होत असल्याचे नाटक केल्याने चौकशी थांबवून तिला उपचारार्थ बालाजी हॉस्पीटल, मालाड (पु) मुंबई येथे नेण्यात आले. त्यामुळे चौकशीत अडथळा निर्माण झाला. आवश्यक तो औषधोपचार करून तीला त्वरीत पुनश्च: चौकशीवर घेण्यात आले. तिला विचार करण्यास अधिक वेळ न देता चौकशीत तासंतास सातत्य ठेवले असता अखेर तीने स्वत:चा आत्मविश्वास गमावून तीचे नातीचा खून केल्याचे सर्वांसमक्ष मान्य केले.

सदर घटनेची सत्यता पडताळून पाहण्याकरीता मयत मुलीच्या वजनाएवढी बाहुली आणून निष्पन्न आरोपी महिला मयत जिया हिची आजी नामे रूक्साना उबेदुल्ला अन्सारी वय ५० वर्ष हिचे करवी तीने केलेला सर्व घटनाक्रम पुनश्च: डेमो स्वरूपात करण्यात आला असता सर्व घटनाक्रम पूणपणे जुळून आला.

१२. त्यानंतर खूनाचे खरे कारण समजून येण्याकरीता तिला अधिक विश्वासात घेवून चौकशी केली असता रूक्साना उबेदुल्ला अन्सारी वय ५० वर्ष हिने तिच्या नातवाशी जिया अन्सारी, वय ०२ वर्ष हिचे खेळताना वारंवार होणाऱ्या भांडणाचा राग मनात धरून दिनांक २८/०९/१९ रोजी पहाटे ०५:३० ते ०५:४५ वा. चे दरम्यान घरातील सर्वजण गाढ झोपेत असताना जीया हिस त्यांचे नमुद ६व्या माळयावरील फ्लॅटचे खिडकीतून खाली फेकून देवून तीचा खून केल्याची माहिती दिली.

१३. गुन्हयातील आरोपी महिला निष्पन्न झाल्याने मयत मुलीची आई नामे फिर्यादी सानिया इजाज अन्सारी वय २१ वर्ष यांचा सदर गुन्हयाच्या अनुषंगाने सविस्तर जबाब नोंद करून कुरार पोलीस ठाणेस गुरक्र. ३९४/१९ कलम ३०२ भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी महिला नामे रूक्साना उबेदुल्ला अन्सारी वय ५० वर्ष हिस नमुद गुन्हयात दिनांक ३०/०९/१९ रोजी अटक करण्यात आली.

१४. नमुद गुन्हयात पाहीजे आरोपीताबाबत कोणताही खात्रीलायक पुरावा/माहिती उपलब्ध नव्हती. आरोपी हि मयताची जवळची नातेवाईक असल्याने चौकशी दरम्यान अनेक अडचणी येवून देखील कुरार पोलीस ठाणेच्या पोलीस पथकाने तपासात सातत्य ठेवून स्वत:चे कौशल्य वापरून नमुद गुन्हयात पाहीजे आरोपीतास निष्पन्न केले व अपमृत्यु नोंद प्रकरण गांभीर्याने घेवून सदर घटनेतून खुना सारखा गंभीर गुन्हा उघडकीस आणण्यास यश

| |
|---|
| संपादन केलेले आहे. |

सदरचा संवेदनशील गुन्हा उघड झाल्याने मा. पोलीस आयुक्त यांनी माहे सप्टेंबर—**२०१९** चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

**कुरार पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| **अ.क्र.** | **पदनाम** | **पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव** |
|---|---|---|
| १ | सहा.पो.आ. | लक्ष्मण नारायण चव्हाण |
| २ | व.पो.नि. | बाबासाहेब नामदेव साळुंखे |
| ३ | पो.नि. | मनोज लक्ष्मण चाळके |
| ४ | पो.नि. | मुकुंद अमृतराव पाटील |
| ५ | स.पो.नि. | गोरखनाथ शिदोजीराव घार्गे |
| ६ | स.पो.नि. | बाजीराव देवीदास नाईक |
| ७ | पो.उ.नि. | धनेश वामन सातार्डेकर |
| ८ | पो.उ.नि. | राजेंद्र रामचंद्र दाभाडे |
| ९ | पोहक्र. २४०८९ | सोमनाथ आनंदा उगले |
| १० | पोनाक्र. ९६१०४४ | सुनील जनार्दन कावले |
| ११ | पोशि. ०३.४०३ | समरेश अरूण भोगले |
| १२ | पोशि ०३.११३४ | राजेश उमाजी मोरे |
| १३ | पोशि ०६.६२६ | नारायण पुंडलीक सपकाळे |
| १४ | पोशि ०६.१४२७ | सुनील बारकु साळवी |
| १५ | पोशि ०८.४६१ | अर्जुन भगवान आहेर |
| १६ | पोशि. ०९.३०८९ | स्वप्नील भगीरथ जोगलपुरे |
| १७ | मपोशि ११.३३९८ | ज्योती बाबु जाधव |

,,,,,,,,,,,,,,